सत्यमेव जयते

विधानसभा आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

चौथा अहवाल

[सन २०१३ च्या तिस-या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल]

(दिनांक एप्रिल, २०१६ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१६

महाराष्ट्र विधानसभा

आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

चौथा अहवाल

[सन २०१३ च्या तिस-या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल]

विधानसभा आश्वासन समिती

(२०१३-२०१४)

समिती प्रमुख :

१. श्री. नवाब मलिक, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

सदस्य :

२. श्री. विलासराव (काका) पाटील, वि.स.स.
३. श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.
४. श्री. रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
५. श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.
६. श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स.
७. श्री. विलास तरे, वि.स.स.
८. श्री. किसन कथोरे, वि.स.स.
९. श्री. दिलीप मोहिते, वि.स.स.
१०. श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील, वि.स.स.
११. श्रीमती संध्यादेवी देसाई उर्फ कुपेकर, वि.स.स.
१२. श्री. प्रकाश मेहता, वि.स.स.
१३. श्री. जयकुमार रावल, वि.स.स.
१४. श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.
१५. श्री. राजन साळवी, वि.स.स.
१६. प्रा. शरद पाटील, वि.स.स.
१७. डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.
१८. श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.
१९. श्री. मुफ्ती मोहम्मद ईस्माईल अ. खलिक, वि.स.स.

निमंत्रित :

*२०. श्री. विजय घोडमारे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

---

* विधानसभा आश्वासन समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ रोजीपासून श्री. विजय घोडमारे, वि.स.स. यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. विधानसभा आश्वासन समितीचे सदस्य श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स. यांची मंत्रीमंडळात नियुक्ती झाल्यामुळे रिक्त झालेल्या त्यांचे जागी श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स यांची समिती सदस्य म्हणून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी नामनियुक्ती केली आहे.

(२०१५-२०१६)

समिती प्रमुख :

१. श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

२. श्री. मधुकरराव चव्हाण, वि.स.स.
३. श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.
४. श्री. धनंजय ऊर्फ सुधीर गाडगीळ, वि.स.स.
५. प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.
६. श्री. लक्ष्मण पवार, वि.स.स
७. श्री. विलासराव जगताप, वि.स.स.
८. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
९. श्री. समीर मेघे, वि.स.स.
१०. श्री. जयप्रकाश मुंदडा, वि.स.स.
११. श्री. संजय शिरसाट, वि.स.स.
१२. श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.
१३. श्री. रणजित कांबळे, वि.स.स
१४. श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.
१५. श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
१६. श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.
१७. श्री. अवधूत तटकरे, वि.स.स.
१८. श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.
१९. श्री. विलास तरे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव,
(३) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(५) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती),
(६) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय			पृष्ठ क्रमांक
(१)	(२)			(३)
	प्रस्तावना :	. .	. .	(सात)
१.	विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या	. .	. .	१
२.	विवरणपत्रे विधानसभेस सादर होण्यास झालेला विलंब	. .	. .	२
३.	सन १९९१ पासून ते सन २०१५ चे तिस-या अखेरपर्यंत वर्षनिहाय व विभागनिहाय आश्वासनांची प्रलंबित यादी.	. .	. .	२
४.	अभिप्राय व शिफारशी	. .	. .	८
	परिशिष्टे :			
	परिशिष्ट एक.--आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती	. .	. .	२१
	परिशिष्ट दोन.--आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके	. .	. .	९९
	परिशिष्ट तीन.--आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण	. .	. .	३०१
	परिशिष्ट चार.--समितीच्या बैठकांचे कार्यवृत्त	. .	. .	३०५

प्रस्तावना

मी, विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून तिच्या वतीने समितीचा चौथा अहवाल सभागृहास सादर करीतआहे. सन २०१३ च्या तिस-या अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन २०१३ च्या तिस-या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधानसभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू चौथा अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट ''एक'' मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके परिशिष्ट ''दोन'' मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट ''तीन'' मध्ये देण्यात आली आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट ''चार'' मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत विचार करून तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : एप्रिल, २०१६.

समिती प्रमुख,
विधानसभा आश्वासन समिती.

अहवाल

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

सन २०१३ च्या तिस-या अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित ३८८ आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी खाली त्यासमोर दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

सन २०१३ च्या तिस-या अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या.

अ. क्र. (१)	आश्वासन पटलावर ठेवल्याचा दिनांक (२)	आश्वासन क्रमांक (३)	आश्वासन संख्या (४)
१.	दिनांक १२ जून २०१४	१, २, ४, ११, १४, २०, २३, २५, २६, २७, ३१, ३३, ३५, ४१, ४४, ४७, ४८, ४९, ५१, ५३, ५७, ६७, ९२, ९६, १०८, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १४०, १४१, १४२, १५४, १६३, १६४, १६५, १८४, १९५, १९६, १९७, १९८, १९९, २००, २०६, २१३, २१४, २२५, २२६, २२९, २३०, २३१, २४१, २४२, २४६, २४८, २५०, २५१, २५२, २५३, २५४, २५५, २५७, २५९, २६०, २६२, २६५, २६९, २७५, २७६, २८४, २८५, २९०, २९१, २९२, २९६, २९८, २९९, ३०१, ३०६, ३०९, ३१०, ३११, ३१५, ३१८, ३१९, ३२०, ३५७, ३७०, ३७९, ३८२	९२
२.	दिनांक १८ डिसेंबर २०१४	३, ७, ८, १३, १६, २१, ३२, ३६, ३७, ४३, ४६, ५५, ५६, ५८, ६३, ६५, ६६, ८४, ९०, ९१, ९३, ९५, ९७, ९९, १०१, १०२, १०४, १०५, १०६, १०७, १०९, ११२, ११३, ११५, ११७, १३४, १३५, १३६, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १६६, १६८, १६९, १७२, १७३, १७४, १७७, १८२, १८३, २०४, २१५, २२०, २२२, २२३, २२४, २२७, २३२, २३६, २३८, २३९, २४०, २४३, २४५, २४७, २५६, २६१, २६३, २६४, २७३, २७७, २७८, २७९, २८०, २८६, ३००, ३०८, ३१२, ३१३, ३१४, ३१६, ३२१, ३२२, ३२३, ३२४, ३२५, ३३०, ३४२, ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५४, ३५५, ३६९, ३७२, ३७३, ३७५, ३८०, ३८१	१०२
३.	दिनांक ७ एप्रिल २०१५	**६, ९, ३०, ३४, ४०, ५२, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, १११, १४३, १६७, १७५, १७६, १८५, २०१, २३५, २७१, २८३, २९५, ३०५, ३१७, ३४३, ३४४, ३४६, ३४७, ३४८, ३४९, ३६१, ३६२, ३६३, ३६४, ३६५, ३६६, ३८७** (आश्वासनांचे वाचन बाकी आहे)	३८
४.	दिनांक २१ जुलै २०१५	**१०, १७, ६४, ७०, ७१,** ९८, १००, १०३, १३३, १३७, २११, २१२, **२८१** (ठळक अंकाचे वाचन बाकी आहे.)	१३
५.	दिनांक १४ डिसेंबर २०१५	१८, ५९, ६०, ६१, ६२, ६९, १२६, १५५, १५६, १५८, १५९, १६०, १८६, १८७, १८८, २०२, २०३, ३०७, (ठळक अंकातील वाचन बाकी आहे.)	१८
		एकूण ...	२६३ + १ **२६४**

- उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे आश्वासन क्र.२६६ समितीने विचारविनिमय करुन वगळले आहे.
- ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे आश्वासन क्र. ३५६ हे वगळण्याबाबतचे आश्वासन विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी प्रलंबित आहे.

• समितीने मान्य केलेली आश्वासने व सद्यःस्थिती विचारलेली व साक्षीसाठी प्रलंबित असलेली आश्वासने = २०२ • पटलावर ठेवलेली परंतु समितीच्या विचार विनिमयासाठी (वाचनासाठी) प्रलंबित असलेली एकूण आश्वासने ६१ • प्रलंबित आश्वासने १२४ **एकूण आश्वासने ...**	**३८८**

विवरणपत्रे सादर होण्यास झालेला विलंब

सन २०१३ च्या तिस-या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण ३८८ आश्वासनांपैकी मा.संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची दिनांकनिहाय संख्या विचारात घेता असे दिसून येते की, साधारणतः ९२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी २ महिना एवढा कालावधी लागलेला आहे, १०२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ७ महिने ११ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ३८ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ३ महिने ६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे.

१३ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ६ महिने २० दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. अद्याप १२४ आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे प्रलंबित आहेत. या प्रलंबित आश्वासनांची सविस्तर माहिती देणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :----

प्रलंबित आश्वासनांची विभागनिहाय यादी

अ. क्र.	विभागाचे नाव	आश्वासन क्रमांक	आश्वासनांची एकूण संख्या
(१)	(२)	(३)	(४)
१.	गृहनिर्माण विभाग	१५७, १६१, १६२	०३
२.	महसूल व वन विभाग	१५, २८, ३८, ३९, ११४, ११६, १२४, १२७, १२८, १२९, १३०, १३१, १३२, १३८, २१७, २१८, २१९, २२८, २९७	१९
३.	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	४५, ८५, ९४, १७८, १७९, १८०, ३६७, ३६८	८
४.	नगरविकास विभाग	५, १२, ८०, ८१, ८२, ८३, ८६, ८७, १४४, १४५, १४७, १५३, १८९, १९०, १९१, १९२, १९३, १९४, २०५, २०७, २०८, २०९, २१०, ३२६, ३२७, ३२८, ३२९, ३३६, ३३७, ३३८, ३३९, ३४०, ३४१, ३८८	३४
५.	गृह विभाग	१९, २३७, २८७, २८८, ३३१, ३३२, ३३३, ३३४, ३३५, ३८३, ३८४, ३८५	१२
६.	सार्वजनिक बांधकाम विभाग	५४, ६८, ७२, ७३, ८८, ८९, १४६, २३३, २३४, २८९, ३७१	११
७.	नियोजन विभाग	३५८, ३५९, ३६०	०३
८.	ग्रामविकास व जलसंधारण विभाग	४२, १२५, १३९, २९३, ३५६, ३७७, ३७८	०७
९.	आदिवासी विकास विभाग	२२	०१
१०.	वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग	२९, १८१, ३७४	०३
११.	महिला व बालविकास विभाग	२९४	०१
१२.	सार्वजनिक आरोग्य विभाग	२४, ५०, २६८, २७०, २७२, ३८६	०६
१३.	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	१७०, १७१, २१६, २४४,	०४
१४.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	३४५	०१
१५.	जलसंपदा विभाग	३०२, ३०३, ३०४	०३
१७.	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	११०, २७४	०२
			०३

१८.	सामाजिक न्याय व विशेष कार्य विभाग	२४९, २५८, ३७६	०१
१९.	अल्पसंख्याक विभाग	२२१	०१
२०.	रोजगार हमी योजना विभाग	२६७	०१
२१.	पर्यटन, सांस्कृतिक कार्य विभाग	२८२	
		एकूण . .	

- पुढील क्रमांक कोणत्याही आश्वासनांना देण्यात आले नाहीत.

उपरोक्त आश्वासनांबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही/अंतरिम माहिती देखील, संबंधित विभागांनी समितीला पुरविलेली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर ही आश्वासने प्रलंबित राहिली नसती असे समितीला वाटते. आता तरी विभागाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन प्रलंबित असलेल्या आश्वासनांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर लवकरात लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी. या आश्वासनांबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या **''कार्यवाहीचे विवरण''** जरी सादर करण्यात आलेले नसले तरी या आश्वासनांच्या क्रमांकानुसार करण्यात आलेल्या नोंदी सभागृहाच्या माहितीसाठी अहवालामध्ये अंतर्भूत करण्याचे समितीने ठरविले आहे. **''कार्यवाहीचे विवरणपत्र तात्काळ सादर करण्यात यावे''** असे त्या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. एक महिन्याच्या आत असे विवरणपत्र सादर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०१५ च्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनापर्यंत दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या आश्वासनांची विभागनिहाय यादी

अ.क्र.	विभागाचे नाव	सन १९९१ चे सन २००० पर्यंतची प्रलंबित आश्वासने (प्राप्त आश्वासने)	सन २००१ ते सन २०१५ च्या तिस-या (हिवाळी) अधिवेशनापर्यंत प्रलंबित आश्वासने (प्राप्त आश्वासने)	एकूण प्रलंबित आश्वासने	एकूण प्राप्त आश्वासने	शिल्लक आश्वासने
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	महसूल व वन विभाग . .	०९	५५१	५६०	४६	५१४
२	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग . .	निरंक	१७६	१७६	५३	१२३
३	नगरविकास विभाग . .	१४	८९२	९०६	९५	८११
४	सार्वजनिक आरोग्य विभाग . .	निरंक	१७९	१७९	०९	१७०
५	गृह विभाग . .	निरंक	३३१	३३१	५६	२७५
६	सामाजिक न्याय व वि. स. विभाग . .	निरंक	१४८	१४८	६३	८५
७	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग . .	निरंक	२६२	२६२	७२	१९०
८	ग्रामविकास व जलसंधारण विभाग . .	निरंक	१७९	१७९	३१	१४८
९	उच्च व तंत्रशिक्षण विभाग . .	निरंक	५९	५९	२१	३८
१०	जलसंपदा विभाग . .	निरंक	८९	८९	३०	५९
११	वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग . .	निरंक	८६	८६	०५	८१
१२	कृषी व पदुम विभाग . .	निरंक	१२८	१२८	३७	९१
१३	सार्वजनिक बांधकाम विभाग . .	निरंक	१४६	१४६	३२	११४
१४	गृहनिर्माण विभाग . .	निरंक	९२	९२	१६	७६
१५	महिला व बालविकास विभाग . .	निरंक	२५	२५	०९	१६
१६	सहकार व वस्त्रोद्योग विभाग . .	निरंक	१०९	१०९	३५	७४
१७	पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग . .	निरंक	९५	९५	११	८४
१८	सामान्य प्रशासन विभाग . .	निरंक	२६	२६	१८	०८
१९	आदिवासी विकास विभाग . .	निरंक	५१	५१	०५	४६
२०	नियोजन विभाग . .	निरंक	५३	५३	१८	३५
२१	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	निरंक	३८	३८	०९	२९
२२	विधि व न्याय विभाग . .	निरंक	३१	३१	२६	०५
२३	वित्त विभाग . .	निरंक	०८	०८	०३	०५
२४	पर्यावरण विभाग . .	निरंक	४४	४४	२१	२३
२५	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग . .	निरंक	०९	०९	०७	०२
२६	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग . .	निरंक	४०	४०	०५	३५
२७	अल्पसंख्याक विभाग . .	निरंक	२५	२५	०९	१६
२८	मराठी भाषा विभाग . .	निरंक	०४	०४	०४	निरंक
२८	संसदीय कार्य विभाग . .	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	एकूण . .	**२३**	**३८७६**	**३८९९**	**७४६**	**३१५३**

महाराष्ट्र विधानसभा

प्रलंबित आश्वासनांची वर्षनिहाय व अधिवेशननिहाय यादी

सन २०१५च्या तिस-या (हिवाळी) अधिवेशनात आश्वासनपूर्ततेची विवरणपत्रे पटलावर ठेवल्यानंतरची स्थिती

वर्ष	अधिवेशन	दिलेली आश्वासने	एकूण	निकाली आश्वासने	एकूण	प्रलंबित आश्वासने	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१९९१	पहिले	४७२		४७०		२	
	दुसरे	५८४		५८४		०	
	तिसरे	३८२		३८२		०	
			१४३८		**१४३६**		**०२**
१९९२	पहिले	५६८		५६८		०	
	दुसरे	४३३		४३३		०	
	तिसरे	१७३		१७३		०	
			११७४		**११७४**		**०**
१९९३	पहिले	८४७		८४६		१	
	दुसरे	५४३		५४२		१	
	तिसरे	६९०		६८७		३	
			२०८०		**२०७५**		**५**
१९९४	पहिले	१४७७		१४७५		२	
	दुसरे	९१५		९१४		१	
	तिसरे	४४५		४४४		१	
			२८३७		**२८३३**		**४**
१९९५	पहिले	२८२		२८२		०	
	दुसरे	११८९		११८८		१	
	तिसरे	९९४		९९४		०	
			२४६५		**२४६४**		**१**
१९९६	पहिले	४१२		४११		१	
	दुसरे	७०४		७०३		१	
	तिसरे	४७७		४७७		०	
			१५९३		**१५९१**		**२**
१९९७	पहिले	४८६		४८६		०	
	दुसरे	१४८		१४८		०	
	तिसरे	२८०		२७७		३	
			९१४		**९११**		**३**
१९९८	पहिले	६२६		६२६		०	
	दुसरे	२६९		२६९		०	
	तिसरे	३०६		३०६		०	
			१२०१		**१२०१**		**०**
१९९९	दुसरे	५३५		५३३		२	

	चौथे	५०८		५०६	२	
			१०४३	**१०३९**		**४**
२०००	पहिले	९६५		९६४	१	
	दुसरे	१८०		१८०	०	
	तिसरे	२६२		२६१	१	
			१४०७	**१४०५**		**२**
२००१	पहिले	३०९		३०९	०	
	दुसरे	३४५		३४४	१	
	तिसरे	२७४		२७४	०	
			९२८	**९२७**		**१**
२००२	पहिले	५१९		५१५	४	
	तिसरे	३४२		३३९	३	
	चौथे	४१९		४१७	२	
			१२८०	**१२७१**		**९**
२००३	दुसरे	६८९		६८०	९	
	चौथे	७३६		७२५	११	
	पाचवे	७०१		७००	१	
			२१२६	**२१०५**		**२१**
२००४	पहिले	४१		३९	२	
	दुसरे	६४१		६२९	१२	
	चौथे	५२२		५१३	९	
			१२०४	**११८१**		**२३**
२००५	पहिले	१३५७		१३५२	५	
	दुसरे	११३५		११२५	१०	
	तिसरे	७१३		७१०	३	
			३२०५	**३१८७**		**१८**
२००६	पहिले	१३०४		१२८०	२४	
	दुसरे	६७३		६६२	११	
	तिसरे	९०४		८९०	१४	
			२८८१	**२८३२**		**४९**
२००७	पहिले	१३८९		१३७१	१८	
	दुसरे	७५७		७४४	१३	
	तिसरे	५३३		५१९	१४	
			२६७९	**२६३४**		**४५**

२००८	पहिले	९८३		९५७	२६	
	दुसरे	१७७		१७५	२	
	तिसरे	३५३		३३७	१६	
			१५१३	**१४६९**		**४४**
२००९	पहिले	२२		२१	१	
	दुसरे	४८४		४६८	१६	
	तिसरे	१		१	०	
	चौथे	३१९		३१२	७	
			८२६	**८०२**		**२४**
२०१०	पहिले	१३२५		१२५३	७२	
	दुसरे	५८०		५३७	४३	
	तिसरे	५८२		५२७	५५	
			२४८७	**२३१७**		**१७०**
२०११	पहिले	९८१		९१६	६५	
	दुसरे	३४१		३२४	१७	
	तिसरे	२३४		२१३	२१	
			१५५६	**१४५३**		**१०३**
२०१२	पहिले	८६१		७८०	८१	
	दुसरे	४९५		४३९	५६	
	तिसरे	४२२		३७८	४४	
			१७७८	**१५९७**		**१८१**
२०१३	पहिले	५५७		४७३	८४	
	दुसरे	४५१		३३१	१२०	
	तिसरे	३८८		२६३	१२५	
			१३९६	**१०६७**		**३२९**
२०१४	पहिले	५७		३५	२२	
	दुसरे	४६०		२६५	१९५	
	तिसरे (विशेष)	७		५	२	
	चौथे (हिवाळी)	८२२		३५९	४६३	
			१३४६	**६६४**		**६८२**
२०१५	पहिले	११८९		३६९	८२०	
	दुसरे	६७४		६३	६११	
			१८६३	**४३२**		**१४३१**
		एकूण	**४३२२०**	**४००६७**		**३१५३**

सर्वसाधारण अभिप्राय व शिफारशी

विधानसभा सभागृहात मा. सदस्यांद्वारा विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींवरील चर्चेला उत्तर देत असताना मा. मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनांच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असलेल्या बाबी समितीने आपल्या यापूर्वी सादर केलेल्या विविध अहवालांद्वारा वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या असूनही त्यामध्ये शासनाकडून आश्वासनांची पूर्तता करण्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही. प्रलंबित आश्वासने विचारात घेता ज्या आश्वासनामध्ये शासन स्तरावर कार्यवाही करणे, त्याची पूर्तता करणे सहज शक्य आहे अशी आश्वासने देखील शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिका-यांच्या उदासीनतेच्या धोरणामुळे विधानमंडळास सादर करण्यात कमालीचा विलंब होत आहे. ज्या आश्वासनांसंदर्भात विषय न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहेत अशा आश्वासनांसंदर्भात विलंब होत असल्यास ती बाब समजण्यासारखी आहे. तथापि, जी आश्वासने शासनाच्या स्तरावर वेळीच निपटारा करणे शक्य असतात अशी आश्वासने वेळेत पाठविण्यामध्ये जी दिरंगाई शासनाकडून दाखविली जाते ती अक्षम्य आहे असे समितीचे मत आहे. यासाठी समितीला संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते, कारण विलंबाने येणाया आश्वासनांमुळे सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध संसदीय आयुधांवर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या अभिवचन अथवा आश्वासनांची वेळीच पूर्तता झाली नसेल तर सभागृहात जे सन्माननीय सदस्य राज्यातील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले विषय उपस्थित करतात, ज्या बाबींसंदर्भात शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत उहापोह केला जातो त्यात सुधारणा अथवा आणखी काही बदल करण्याची मागणी विविध संसदीय आयुधांमार्फत सभागृहात केली जाते व अशी मागणी मा.मंत्री महोदयांच्या माध्यमातून आश्वासनांच्या रुपाने सभागृहात पूर्तता झाल्यानंतरच सदरच्या आश्वासनांवर वि वास ठेवून संबंधित संसदीय आयुध तेवढ्यापुरते सभागृहात थांबविले जाते. याचा अर्थ असा आहे की, जे आश्वासन सभागृहात दिले जाते त्यावर शासनाने सर्वंकष कार्यवाही करून त्याचा पूर्तता अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तद्वतच विधानसभेच्या या समितीकडे सदरच्या आश्वासनपूर्ततेचा परिपूर्ण अहवाल पाठविणे आवश्यक आहे. **तथापि, अधिका-यांद्वारा या बाबींसंदर्भात अक्षम्य विलंब केला जात असल्यामुळे याची जबाबदारी संबंधित अधिका-यांवर निश्चित करून त्या संदर्भात शासनाने कडक धोरण आखून सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी शासनाने एक सर्वंकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करून आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिका-यांविरुद्ध ठोस कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा. तसेच दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव/ प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव/ सह सचिव यांचे समवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबत आढावा बैठका घेऊन मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासने/ अभिवचने संदर्भात जी आश्वासने/ अभिवचने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सन २०१३ च्या तिस-या अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या ३८८ आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे जून २०१४ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली. या ३८८ आश्वासनांपैकी समितीने २०२ आश्वासनांचे वाचन करून त्यावर निर्णय घेतला, ६१ आश्वासने ही समितीच्या विचार विनिमयासाठी (वाचनांसाठी) प्रलंबित आहेत. १ आश्वासन वगळले आणि सुमारे १२४ आश्वासने प्रलंबित आहेत. शासनाने केलेल्या या कार्यवाहीबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

मा. मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही एक मोठी समस्या आहे. यात संसदीय कार्य विभागाने संबंधित विभागाशी संपर्क ठेवून कोणत्याही परिस्थितीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी विवरणपत्रे विहित मुदतीत सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. सदरची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. या बाबीसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.

संसदीय लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहात देण्यात येणाया आश्वासनांना अनन्य साधारण महत्व आहे. मा.सदस्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या विषयांवर चर्चा उपस्थित करून संबंधित मंत्रिमहोदयांना त्यावर लगेच कार्यवाही करणे शक्य होत नसल्याने काही विषयांच्या बाबतीत आश्वासने दिली जातात. अशा आश्वासनांची पूर्तता सुदृढ संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण या आश्वासनांचा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेवर प्रभाव पडत असतो आणि सदरच्या आश्वासनांची वेळीच पूर्तता झाल्यास जनतेमध्ये त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो. तथापि, वर्षानुवर्षे आश्वासनांची पूर्तता न झाल्यास जनतेचा शासन व्यवस्थेवरील वि वास उडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतीय संविधानात विधानमंडळाच्या दोन अधिवेशनामधील कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये अशी तरतूद आहे. या तरतुदीस अनुसरुन आपल्या राज्यातील राज्य विधानमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होत असतात. ज्याला आपण उन्हाळी (अर्थसंकल्पीय), पावसाळी, आणि हिवाळी अधिवेशने असे संबोधतो. म्हणूनच सभागृहात देण्यात येणा-या प्रत्येक आश्वासनांच्या पूर्ततेचा कालावधी हा ९० दिवसांचा ठेवण्यात आलेला आहे. या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची/ अभिवचनांची पूर्तता ज्या अधिवेशनात दिली त्याच्या

पुढच्या अधिवेशनात त्याची पूर्तता व्हावी हा उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना राबविताना अशा आश्वासनांची पूर्तता करताना शासनाच्या संबंधित विभागास पुरेसा वेळ मिळावा ही या मागील भूमिका आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाच्या सर्व संबंधित अधिका-यांचे कर्तव्य असते की, **सभागृहात मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आ वासित केलेली आश्वासने प्रस्तावित करून त्यानंतर निर्णय घेऊन त्यानंतर येणा-या लगतच्या अधिवेशनात आश्वासनांची पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे. विधानसभेच्या नियमानुसार आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनास ९० दिवस इतक्या कालावधीची मर्यादा घालून दिलेली आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, यासाठी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित केल्यास बहुतांशी आश्वासनांची पूर्तता ही वेळेत किंबहुना वेळेच्या आधीदेखील होऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनाची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सरपणे विलंबाने करणाया संबंधित विभागाच्या उप सचिव/सह सचिव दर्जाच्या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उक्त अधिकायांनी त्यांच्या कार्यकाळात त्या संदर्भात नस्ती प्रस्तावित करून आश्वासन पूर्ततेचा पाठपुरावा करून व तसे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वंकष निर्णय घेऊन या संदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

सन १९९१ ते सन २०१५ या कालावधीतील एकूण आश्वासनांची संख्या ४३,२२० इतकी आहे. त्यापैकी आतापर्यंत शासनाने ४०,०६७ इतकी आश्वासने निकाली काढली आहेत आणि प्रलंबित आश्वासनांची संख्या ३,१५३ इतकी आहे.

वरीलप्रमाणे प्रलंबित आश्वासनांची संख्या विचारात घेता ती मोठ्या प्रमाणावर आहे. सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाया आश्वासनांची संसदीय कार्य विभागाकडून विविध विभागाद्वारे पाठविलेली आश्वासने एकत्रित करून ती सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. अशा आश्वासनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्यातील वेगवेगळ्या विभागाकडून संसदीय कार्य विभागाकडे पाठविण्यात आलेली आश्वासने याचे एकत्रित संकलन करून त्याचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. अशा संकलित केलेल्या आश्वासनाच्या विवरणाच्या प्रती अहवालाच्या माध्यमातून विधानमंडळाला सादर कराव्या लागतात. म्हणून विभागाने आश्वासनांची पूर्तता संसदीय कार्य विभागाकडे करताना विवरणपत्रे 'सॉफ्ट कॉपी' मध्ये अर्थातच 'पेनड्राईव्ह' मध्ये घेऊन संसदीय कार्य विभागाकडे सादर करावी व संसदीय कार्य विभागाने अशा एकत्रित जमा झालेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता एकत्रित सॉफ्ट कॉपीमध्ये घेऊन ती विधानमंडळाकडे सादर करावी व अशा एकत्रित केलेल्या विवरणपत्राची माहिती **शासनामार्फत वेळोवेळी पटलावर ठेवण्यात येणाया वर्षनिहाय व प्रत्येक अधिवेशननिहाय आश्वासनांबाबतच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही विवरणपत्रासह कॉम्पॅक्ट् डिस्क (सी.डी.) स्वरुपात घेऊन सादर करावी. याकामी शासनाचा खर्च कमी होण्याच्या दृष्टीकोनातून पेपरलेसस्वरुपात माहिती समितीला पुरविण्यात यावी अशीही समितीची आग्रहाची मागणी आहे. आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणा--या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मंत्री/ राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेली आश्वासने व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये ब-याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. आश्वासनांचा विषय व त्याच्या पूर्ततेबाबतदेखील तफावत दिसून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारुन नेण्यासाठी समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी विवरणपत्रात आढळून येणा-या त्रुटींबाबत समिती गांभीर्याने घेत असून यापुढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणा-या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करुनच समितीकडे परिसृत करावीत व या संदर्भात शासनाने सर्वंकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करून त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

विशेष अभिप्राय व शिफारशी

महिला व बाल विकास विभाग

(१) विधानसभा आश्वासन क्रमांक ९३, विधानसभा कामकाज खंड क्र. १६७, क्रमांक-५, दिनांक १३ डिसेंबर २०१३

''राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्याबाबत'' या विषयावरील सर्वश्री सुरेश देशमुख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १८१७ ला उत्तर देताना मा. महिला व बालविकास मंत्री यांनी **''अंगणवाडी कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर एकरकमी ठोक रक्कम देण्याबाबतचा व भाऊबीज भेट देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.''** असे आश्वासन दिले होते.

राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना सेवानिवृत्तीनंतर एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरकमी लाभ देण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या दिनांक ५ फेब्रुवारी २०१४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून शासन निर्णय निर्गमित झाला आहे तसेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अंगणवाडी कर्मचा-यांना रु. १,०००/- प्रमाणे भाऊबीज भेट देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ६ डिसेंबर २०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने बुधवार, दिनांक ९ सप्टेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. यासंदर्भात विभागाने आश्वासनाच्या सद्यास्थितीच्या विवरणामध्ये नमूद केले आहे की, 'राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवानिवृत्तीनंतर एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरकमी लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी कर्मचायांना एल.आय.सी. योजनेअंतर्गत सेवानिवृत्तीनंतर एकरकमी लाभ देण्याबाबतच्या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी रु. ४९.०० कोटी शासन निर्णय दिनांक ०४ सप्टेंबर २०१४ अन्वये व रु. ३६.४३ कोटी शासन निर्णय दिनांक ०३ फेब्रुवारी २०१५ अन्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आता जसजशी अंगणवाडी कर्मचा-यांची सेवानिवृत्ती नंतर एकरकमी लाभाची प्रकरणे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे प्राप्त होतात त्यानंतर ती एल.आय.सी. कार्यालयाकडे सादर करून निकाली काढली जातात. तसेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अंगणवाडी कर्मचा-यांना रु. १००० प्रमाणे भाऊबीज देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०६ डिसेंबर २०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे व रु. १००० भाऊबीज भेट अंगणवाडी कर्मचायांना अदा करण्यात आलेली आहे.'

विभागीय सचिवांनी सद्य:स्थितीबाबत माहिती देताना सांगितले की, एलआयसी योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबत दि. ३० एप्रिल २०१४ रोजी शासन निर्णय निघालेला आहे. एलआयसीकडे यासंदर्भात ४९ कोटी रुपये शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर २०१४ अन्वये व रु. ३६.४३ कोटी शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी २०१५ अन्वये आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. आयुक्तांनी सदर पैसे एलआयसीमध्ये भरलेले आहेत. या योजनेचा फायदा ५२ लोकांना मिळाला असून ४२ केसेस प्रोसेसमध्ये आहेत. यानंतर अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची दक्षता घेतील जाईल.

समितीने अशी विचारणा केली की, १०००/- रुपयाप्रमाणे भाऊबीज दिली जाणार होती ती दिली गेली आहे काय व भाऊबीजेची तरतूद बजेटमध्ये केली जाते काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन २०१४-२०१५ ची भाऊबीज दिली गेली नव्हती परंतु यासंदर्भातील जीआर आता निघाला आहे. भाऊबिजेची प्रोव्हीजन बजेटमध्ये केली जात असते. मागच्या वेळी भाऊबिजेच्या संदर्भात बजेटमध्ये दोनदा प्रोव्हीजन केली होती. परंतु तरी सुद्धा प्रोव्हीजन झाली नव्हती तसेच वाढीव रक्कमेची प्रोव्हीजन सुद्धा झाली नव्हती. भाऊबीज ही कमिटेड नाही. मानधन आणि भाऊबीज नॉन प्लॅनमध्ये टाकली तर हा प्रश्न पुन्हा पुन्हा येणार नाही. नॉन प्लॅनमध्ये प्रोव्हीजन न केल्यामुळे आम्हाला दरवर्षी मान्यता घ्यावी लागते.

यावर समितीने अशी सूचना केली की, भाऊबीज व मानधन हा खर्च कायमस्वरुपी नॉन प्लॅनमध्ये घेण्यात यावा. त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, केंद्र शासनाची योजना बंद झाली तर मानधन सुद्धा बंद होईल त्यामुळे भाऊबीज व मानधन हे नॉन प्लॅनमध्ये टाकले जात नाही.

यामध्ये केंद्रशासन व राज्य शासनाचा हिस्सा किती आहे. अशी विचारणा समितीने केली असता त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यामध्ये केंद्रशासन व राज्य शासनाचा हिस्सा ५०-५० टक्के आहे. अंगणवाडी सेविकांना ५ हजार रुपये मानधन असून यामध्ये ३ हजार रुपये केंद्र शासन व १०५० रुपये राज्य शासन देत असते. राज्य शासनाने यामध्ये ९५० रुपये वाढीव दिले असून १०५० अधिक ९५० मिळून २००० रुपये हिस्सा राज्य शासनाचा झाला आहे. अंगणवाडी मदतनीसला २५०० रुपये मानधन असून यामध्ये १५०० रुपये केंद्रशासन व १००० रुपयांचा हिस्सा राज्य शासनाचा आहे. मिनी अंगणवाडीला ३२५० रुपये मानधन असून २२५० रुपयांचा हिस्सा केंद्र शासनाचा असून १००० रुपयांचा हिस्सा राज्य शासनाचा आहे.

अभिप्राय व शिफारशी :

''राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत'' या विषयावरील सर्वश्री सुरेश देशमुख व इतर विधानसभा सदस्य यांच्या तारांकित प्रश्न क्र. १८१७ ला उत्तर देताना मा.महिला व बालकल्याण मंत्री यांनी **''अंगणवाडी कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर एकरकमी ठोक रक्कम देण्याबाबतचा व भाऊबीज भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.''** असे आश्वासन विधानसभेत दिले होते. सदरहू आश्वासनाच्या अनुषंगाने समितीने महिला व बालकल्याण विभागाचे प्रधान सचिव यांची साक्ष घेतली.

उक्त साक्षीत विभागाच्या सचिवांनी राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना सेवानिवृत्तीनंतर एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरकमी लाभ देण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या दिनांक ५ फेब्रुवारी २०१४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली असून, शासन निर्णय निर्गमित झाला आहे. तसेच सन २०१३-१४ या वर्षात अंगणवाडी कर्मचायांना रु.१,००० याप्रमाणे प्रति लाभार्थी भाऊबीज भेट देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ६ डिसेंबर २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे असे समितीसमोर विदित केले. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी कर्मचायांना एल.आय.सी. योजनेअंतर्गत सेवानिवृत्तीनंतर एकरकमी लाभ देण्याबाबतच्या योजनेसाठी असणारा निधी रु.४९ कोटी शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर २०१४ अन्वये व रु. ३६.४३ कोटी शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी २०१५ अन्वये, आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यापुढे जास्तीत जास्त अंगणवाडी सेविका सेवा निवृत्तीनंतर एकरकमी लाभाची प्रकरणे बाल विकास अधिकारी यांचेकडे प्राप्त होतात त्यानंतर ती एल.आय.सी. कार्यालयामध्ये सादर करून निकाली काढली जातात असेही समितीसमोर विभागीय सचिवांनी आ वासीत केले.

समितीसमोर आणखी असे सांगण्यात आले की, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना केंद्र शासन व राज्य शासन मिळून मानधन देण्यात येते. अंगणवाडी सेविकांना रु.५,००० मानधन देण्यात येत असून यामध्ये रु. ३,००० केंद्र शासनाचा व रु. २,००० राज्य शासनाचा हिस्सा आहे. त्याचप्रमाणे अंगणवाडी मदतनीसाला एकूण २,५०० मानधन असून यामध्ये १,५०० रु. केंद्र शासन व १,००० रुपये राज्य शासनाचा हिस्सा आहे. तसेच मिनी अंगणवाडी सेविकांना ३,२५० रुपयांचे मानधन असून यात २,२५० रुपये केंद्राचा तर १,००० रुपये राज्य शासनाचा हिस्सा असतो आणि याशिवाय उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक दिवाळीला रु.१,०००/- याप्रमाणे भाऊबीज भेट दिली जाते. उपरोक्त सर्व बाबींवर सर्वंकष विचार केला असता समिती या निष्कर्षाप्रत आली आहे की, राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत अंगणवाडी सेविका सेवानिवृत्तीनंतर एकरकमी ठोक रक्कम देण्याबाबतचा व भाऊबीज देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला असून सेवानिवृत्ती नंतरची रक्कम एल.आय.सी. मध्ये जमा केली जाते. तसेच भाऊबीज म्हणून दिली जाते ती रक्कम विलंबाने दिली जाते. यामुळे लाभार्थ्यांना त्याचा वेळेवर फायदा होत नाही असे समितीच्या निदर्शनास आले आहे. भाऊबीजेची रक्कम रु.१,०००/- असून ही अत्यंत अल्प असल्याचे समितीचे मत आहे. वाढीव महागाई पाहता सदरची रु.१,०००/- ही रक्कम अत्यंत अपुरी वाटते असे समितीला प्रकर्षाने वाटते. अंगणवाडी सेविका व मदतनीस बहुधा आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातून असणाया महिला या सेवेत असतात. त्यांची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत हलाखीची असते त्यांना शासनाद्वारे देण्यात येणारे उपरोक्त नमूद केलेले मानधन देखील अत्यल्प आहे. त्यामानाने या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यावर जबाबदाया मोठ्या प्रमाणावर निश्चित करण्यात आलेल्या आहेत. मुलांना अंगणवाडीत शिकविणे, त्यांना आहार खाऊ घालणे, शासनामार्फत पुरवठा होत असलेल्या आहाराचे नियोजन करणे, अन्न शिजवून ते लहान बालकांना खाऊ घालणे, वजन काटा करणे इ. कामांची जबाबदारी त्यांच्यावर असते. **शासनाने या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना भाऊबीज म्हणून १,०००/- रुपयांची केलेली तरतूद अत्यंत अल्प असून त्यात आणखी रु.१,०००/- (रुपये एक हजार) इतकी वाढ करून एकूण २,०००/- रुपये भाऊबीज म्हणून देण्यासंदर्भात निर्णय घेऊन तो तातडीने निर्गमित करण्यात यावा. तसेच भाऊबीजेची रक्कम बयाचदा वेळेवर मिळत नाही. त्यामुळे या अंगणवाडी सेविका व मदतनीसांमध्ये असंतोष पसरतो. हे टाळण्यासाठी या कामी तरतूद केलेली रक्कम योजनेत्तर अनुदानामध्ये (Non-Plan) तरतूद करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत सदर भाऊबीजेची रक्कम दिवाळीच्या पूर्वी त्यांना वितरीत करावी जेणे करून दिवाळी सारख्या सणाला सदर रक्कम त्यांना उपयोगी पडू शकेल. व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) **विधानसभा आश्वासन क्रमांक ९५, विधानसभा कामकाज खंड १६७, क्रमांक ५, दिनांक १३/१२/२०१३**

''मोताळा (जि. बुलढाणा) तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाकरिता घेण्यात आलेल्या मुलाखतीमधील गैरप्रकाराबाबत'' या विषयावरील श्री. विजयराज शिंदे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८२० ला उत्तर देताना मा. महिला व बालविकास मंत्री, यांनी **''अंगणवाडी निवड समितीने दिलेल्या गुणांची पडताळणी करून योग्य उमेदवारांची निवड करण्यात येईल''** असे आश्वासन दिले होते.

ज्या उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात आली त्या उमदेवारांनी प्रथम अपिल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे दाखल केल्यामुळे प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास अद्यापपर्यंत नियुक्ती आदेश देता आले नाहीत. परंतु सदर अपिल प्रकरणाची सुनावणी निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. असे विभागाने समितीला दिलेल्या लेखी माहितीत नमूद केले आहे. विभागाने केलेल्या कार्यवाहीने समितीचे समाधान न झाल्यामुळे शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले. त्यावर संबंधित विभागाने साक्षीच्या वेळी आश्वासनाच्या सद्यस्थितीच्या माहिती विवरणपत्रामध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे की, 'एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, मोताळा, जि.बुलढाणा अंतर्गत सन २०१३ मध्ये अंगणवाडी सेविका/मदतनीस भरती प्रक्रियेमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदांसाठी पात्र उमेदवारांना महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२००९/प्र.क्र.७८/का.०६, दिनांक १५ सप्टेंबर, २०११ या शासन निर्णयामधील सुधारित परिशिष्ट-अ भाग-१ व भाग-२ नुसार देण्यात आलेल्या गुणांचे गुणपत्रक सोबत जोडून दिले आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये नेमका गैरप्रकार काय झाला होता ? तसेच दोघींमध्ये किती गुणांचा फरक होता ? २-३ गुणांमुळे रिजेक्ट झाल्या काय तसेच फरक काय होता तेही बघितले पाहिजे. नेमकी अनियमितता काय झाली याचा उल्लेख विभागाने दिलेल्या माहितीत नाही.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आपल्याकडे रिपोर्ट आला आहे, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, मोताळा अंतर्गत मौजे सुलतानपूर येथील अंगणवाडी सेविका पदावर सौ. मिरा सुनिल गरुडे यांची व मौजे मोताळा येथील अंगणवाडी मदतनीस पदावर सौ. रमाबाई गजानन वाघ यांची निवड करण्यात आली होती. सदर निवड प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबतचा अहवाल बालविकास प्रकल्प अधिकारी, मलकापूर यांनी सादर केल्यामुळे सौ. मिरा सुनिल गरुडे यांची निवड उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी रद्द केली. निवड रद्द झाल्यामुळे गरुडे व वाघ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल सादर केले.

चौकशीमध्ये अनियमिततेबाबत सांगितले आहे की, मौजे सुलतानपूर येथील अंगणवाडी सेविका पदाकरिता सौ. मिरा सुनील गरुडे यांना अंगणवाडीचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना त्यांना अंगणवाडी निवड समिती अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्येकी ३ गुण प्रदान करून त्यांची अंगणवाडी सेविकापदी निवड घोषित केली. मौजे धामणगांव बढे येथील मदतनीस पदाकरिता सौ. जीजाबाई ज्ञाने वर चौधरी यांना अंगणवाडीचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना निवड समिती अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांनी त्यांना प्रत्येकी २ गुण देऊन त्यांची अंगणवाडी मदतनीसपदी निवड केली होती. मौजे मोताळा येथील अंगणवाडी मदतनीस पदाकरिता सौ. रमाबाई गजानन वाघ यांनासुद्धा अंगणवाडी केंद्राचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना त्यांना अंगणवाडी निवड समिती अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांनी प्रत्येकी ३ गुण देऊन त्यांची निवड घोषित केली, अनुभव नसताना त्यांना घेतले आहे ही अनियमितता झाली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

''मोताळा (बुलढाणा) तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाकरिता घेण्यात आलेल्या मुलाखतीमधील गैरप्रकाराबाबत'' या विषयावरील श्री.विजयराज शिंदे,वि.स.स.यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८२० ला उत्तर देताना मा. महिला व बालविकास मंत्री यांनी अंगणवाडी निवड समितीने दिलेल्या गुणांची पडताळणी करून योग्य उमेदवारांची निवड करण्यात येईल असे आश्वासन सभागृहात दिले होते.

त्यानुसार समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता याप्रकरणी एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, मोताळा जिल्हा बुलढाणा अंतर्गत सन २०१३ मध्ये अंगणवाडी सेविका/ मदतनीस भरती प्रक्रियेमध्ये पात्र उमेदवारांना महिला व बालविकास शासन निर्णय क्र.एबावि-२००९/ प्र.क्र.७८/ का.०६, दिनांक १५ सप्टेंबर, २०११ या शासन निर्णयामधील सुधारित परिशिष्ट - अ भाग १ व भाग २ नुसार देण्यात आलेल्या गुणांचे गुणपत्रकात सुलतानपुर येथील अंगणवाडी सेविका पदाकरिता सौ. मिरा सुनील गरुडे यांना अंगणवाडीचा कोणतेही प्रकारचा अनुभव नसताना त्यांची अंगणवाडी निवड समिती अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्येकी ३ गुण प्रदान करून अंगणवाडी सेविकापदी निवड घोषित केली. मौजे धामणगांव बडे येथील सौ.जिजाबाई ज्ञाने वर चौधरी यांना अंगणवाडीचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना निवड समिती अध्यक्ष व सदस्य यांनी त्यांची प्रत्येक २ गुण देऊन अंगणवाडी मदतनीस पदी निवड केली. त्याचप्रमाणे मौजे मोताळा येथील सौ.रमाबाई गजानन वाघ यांनासुद्धा अंगणवाडी केंद्राचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना त्यांचीही समिती अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्येकी ३ गुण देऊन निवड घोषित केली.

उपरोक्त बाब विचारात घेता अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या भरती प्रक्रियेबाबत अनियमितता झाली ही बाब सिद्ध होते. तथापि या अंगणवाडी निवड समितीच्या अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली याबाबतची माहिती समितीसमोर आलेली नाही. अंगणवाडी सेविका व मदतनीस भरती प्रक्रियेमध्ये अवैधपणे गुण देऊन विशिष्ट व्यक्तीस पक्षपातीपणा करून मदत करणे हे गंभीर असल्याचे समितीचे मत आहे. म्हणून याप्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला १ महिन्यात पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

विधानसभा आश्वासन क्रमांक :- १७२, १७३, १७४ व १७७ विधानसभा कामकाज खंड १६७ क्रमांक ८, दिनांक १८ डिसेंबर, २०१३.

''ठाणे जिल्ह्यातील तारापूर एमआयडीसी मधील अनेक कारखान्यांचा वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे हजारो कामगार बेरोजगार होणे.'' या विषयावरील श्री. एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेद्वारे चर्चा उपस्थित केली असता चर्चेच्या अनुषंगाने मा.उद्योग मंत्री यांनी

(१) आश्वासन क्रमांक १७२- ला ''ज्या कंपन्या नियमाप्रमाणे अटी व शर्ती पाळत नसतील तर त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल.'' **(२) आश्वासन क्रमांक १७३-** ''प्रदूषण महामंडळ आणि संबंधित इतर महामंडळाच्या प्रमुखांशी बोलून यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्याचा प्रयत्न करीन.'' **(३) आश्वासन क्रमांक १७४-** ''परंतु तरीही हे रस्ते एमआयडीसी क्षेत्रात असल्यामुळे या रस्त्यांची वर्क ऑर्डर दिलेली आहे. या रस्त्यांच्या कामाला लवकरच सुरुवात होईल.'' (४) **आश्वासन क्रमांक १७७-** ''उद्योग बाहेर जाऊ नयेत म्हणून ज्या नवीन गोष्टी सांगितल्या आहेत, त्याची १०० टक्के अंमलबजावणी केली जाईल.'' असे आश्वासन दिले होते.

विभागाने आश्वासनावर केलेली कारवाई बाबतचा सादर केलेल्या माहितीत नमूद केले आहे की, **(१) आश्वासन क्रमांक १७२-** जेएसडब्ल्यू, वाशिम व लिबर्टी ऑईनमेंट, बामणे या कंपन्यांच्या संदर्भात सदर कंपन्या जर पर्यावरणविषयक नियमांचे पालन करीत नसल्यास त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबत पर्यावरण विभागास दि. ९/०६/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. **(२) आश्वासन क्रमांक १७३-** एसएमएस, शिवाजीनगर या कंपनीच्या संदर्भात पहाणी करून त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबत पर्यावरण विभाग तसेच मुंबई महानगर पालिकेस दि. ९/०६/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. **(३) आश्वासन क्रमांक १७४-** सांगली मिरज औद्योगिक क्षेत्रातील मिरज ब्लॉक मधील रस्ते व पथदिवे यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी नविन दरसूचीनुसार रु. ७,८२,७८, ००/- इतक्या रक्कमेस सर्वसाधारण मंजुरी देण्यात आली आहे व स्थापत्य कामासाठी रु. ६१२.९१ लक्ष रक्कमेच्या निविदा मागविण्यात आल्या असून पुढील मंजूरीच्या प्रक्रियेत आहेत. **(४) आश्वासन क्रमांक १७७-** राज्याच्या औद्योगिक विकासाच्यादृष्टीने व राज्यातून उद्योग बाहेर जाऊ नयेत यासाठी नवीन औद्योगिक धोरणात सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी तसेच विद्यमान घटकांच्या विस्तारासाठी पात्रता कालावधीकरिता औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, मुद्रांक शुल्क

माफी (अ व ब वर्गीकृत क्षेत्र वगळून) व विद्युत शुल्क माफी (फक्त नवीन घटकांसाठी) अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच नवीन सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना विद्युत देयकात ५० पैसे ते १ रुपया प्रती युनिट इतकी सवलत उत्पादनाच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत (अ वर्गीकृत क्षेत्र वगळून) व मुदत कर्जावर ५ टक्के व्याज अनुज्ञेय करण्यात आले आहे. तसेच मोठ्या उद्योगांना क्षेत्रनिहाय वर्गीकरणानुसार ७ वर्षांसाठी अनुज्ञेय भांडवली गुंतवणुकीच्या ३० ते ८० टक्कयांपर्यंत औद्योगिक विकास प्रोत्साहने देण्याचा तर सुक्ष्म व लघु उद्योगांना क्षेत्रनिहाय वर्गीकरण विचारात घेऊन ७ ते १० वर्षांसाठी १० ते १०० टक्क्यांपर्यंत प्रोत्साहने देण्याचा समावेश आहे. सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

विभागाने केलेल्या कार्यवाहीने समितीचे समाधान न झाल्यामुळे त्यावर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागाने खालीलप्रमाणे अधिक माहिती समितीसमोर विवरणपत्रान्वये सादर केली.

आश्वासन क्रमांक १७२-- प्रदुषणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची देखरेख असते. जर कंपन्या नियमानुसार सांडपाणी प्रक्रिया करत नसतील व प्रदूषणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करत नसतील तर त्यांचेवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्यात येते.

आश्वासन क्रमांक १७३--- सदरील आश्वासन हे मानखुर्द शिवाजीनगर क्षेत्रातील एसएमएस कंपनीबद्दल आहे. सदर कंपनी म.औ.वि. महामंडळाच्या क्षेत्रात नसल्याने, पर्यावरण विभाग व मुंबई महानगरपालिका यांना सदर कंपनीची पाहणी करून नियमानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे.

आश्वासन क्रमांक १७४--- सांगली-मिरज औद्योगिक क्षेत्रातील खराब रस्त्यांची दुरुस्ती, मजबुतीकरण व प्राथमिक डांबरीकरण करणे व उर्वरित रस्त्यांना खड्डे भरुन ए.सी. ट्रिटमेंट देणे या कामाची रुपये ४७१.९४ लक्ष किंमतीची निविदा स्वीकृत केली असून, महामंडळाचे पत्र क्र. बी-१५५९८, दि. १६/०४/२०१५ नुसार कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर काम प्रगतीपथावर असून आजपर्यंत रुपये १६९.६३ लक्षचे काम पूर्ण झालेले आहे. करारनाम्यानुसार सदर काम जानेवारी, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

आश्वासन क्रमांक १७७--- महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ हे दि. २४/०२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले असून, त्याचा दि. १/०४/२०१३ ते ३१/०३/२०१८ असा कालावधी आहे. तसेच सदर औद्योगिक धोरणाची उद्दिष्ट्ये व लक्ष साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना अंतर्भूत करण्यात आल्या आहेत :----

(१) विशाल व अतिविशाल उद्योगांना एकत्रित प्रोत्साहने.

(२) मोठ्या उद्योगांना प्रस्ताव.

(३) सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना प्रोत्साहने.

(४) औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे.

(५) औद्योगिक वापरासाठी अधिक क्षेत्र उपलब्ध करून देणे.

(६) गुंतवणूकदारांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.

(७) कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.

(८) सामाईक सुविधा केंद्राची स्थापना करणे.

(९) आजारी उद्योग घटकांचे पुर्नवसन, अभय योजना व बंद घटकांकडून प्रोत्साहनांची वसुली.

सदर औद्योगिक धोरणाची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी सद्यास्थितीबाबत अधिक माहिती समितीला दिली की, तारापूर एमआयडीसी क्षेत्र हे एक मोठे उद्योग क्षेत्र आहे. या सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा प्रॉब्लेम झाल्यामुळे हे प्रकरण उद्‌भवले होते. हा पट्टा ५८ उद्योगांचा होता, यामध्ये केवळ या ५८ छोट्या उद्योगांमधून निर्माण होणाया सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत होती. उर्वरित मोठमोठ्या उद्योगांना सांडपाण्यावरील प्रक्रियेकरिता या वॉटर ट्रिटमेंट प्लांटकडे येण्याची आवश्यकता नाही. या उद्योगांच्या सांडपाण्यावर प्रक्रिया न होता, त्या पाण्यामुळे प्रदूषण वाढल्याने पोल्यूशन कंट्रोल बोर्डाच्या आदेशानुसार या कंपन्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला होता. एमआयडीसी क्षेत्रातील १३० हेक्टरचा हा भूखंड १९४७ मध्ये या उद्योगांना देण्यात आला होता. या क्षेत्रालगत एक कॉमन एफ्ल्युएंट वॉटर ट्रीटमेंट प्लांट आहे. याची क्षमता २५ एमएलडी आहे. परंतु आता एमआयडीसी क्षेत्रातील वाढत्या उद्योगांची संख्या पाहता आणखी एक ५० एमएलडी क्षमता असलेला कॉमन एफ्ल्युएंट वॉटर ट्रीटमेंट प्लांटचे काम सुरू झालेले आहे. याकरिता एमआयडीसी ८० कोटी रुपये खर्च करीत आहे. ज्या छोट्या उद्योगांना सांडपाण्यावर प्रक्रिया करणे परवडत नाही. त्यांच्याकरिता हे सामुदायिक पाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात आलेले आहे.

एमआयडीसी क्षेत्रालगतच्या रहिवासी परिसरामध्ये या पाण्याचे प्रदूषण टाळण्याकरिता काही पाणी प्रक्रियेनंतरही कुठेही सोडता येत नाही, असे पाणी समुद्राजवळ सोडण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. एमआयडीसी क्षेत्रामध्ये छोट्या उद्योगांची एकूण संख्या ५५० इतकी आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, याकरिता आपण प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनादेखील आजच्या साक्षीकरिता बोलाविणे आवश्यक होते. उद्योग विभागाप्रमाणे आपण त्यांनाही या उद्योगांच्या सांडपाण्याच्या प्रक्रियेबाबतचे प्रश्न विचारु शकलो असतो. विभागाने या संदर्भातील कारवाईत पुढीलप्रमाणे म्हटलेले आहे. एसएमएस, शिवाजीनगर या कंपनीच्या संदर्भात पाहणी करून त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबत पर्यावरण विभाग तसेच मुंबई महानगरपालिकेस दिनांक ९ जून, २०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्यानंतर विभागीय सचिवांनी आश्वासन क्रमांक १७४ बाबत असे सांगितले की, सांगली औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांच्या कामाच्या निविदा प्रक्रिया जानेवारी, २०१६ पर्यंत पूर्ण होणार आहेत. दिनांक १६ एप्रिल, २०१४ रोजी या कामांची वर्कऑर्डर देण्यात आली होती. याकरिता १६९ लाख रुपये खर्च येणार आहे. जानेवारी २०१६ पर्यंत हे निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण होईल.

आश्वासन क्रमांक १७७ बाबत विभागीय सचिवांनी अधिक माहिती दिली की, राज्यातील उद्योग बाहेर जाऊ नये म्हणून राज्य शासन आणि केंद्र शासन प्रयत्न करीत आहे. भविष्यकाळात आपल्या राज्यातील औद्योगिक क्षेत्रात ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. राज्यात नवनवीन उद्योग स्थापन करण्याकरिता एक मैत्री कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. या मैत्री कक्षाच्या माध्यमातून उद्योगांना परवानगी देण्याबाबतची क्लिष्टता कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. राज्यातील अनेक उद्योगांना निरनिराळ्या प्रकारच्या परवानग्या घेण्याकरिता अडचणींचा सामना करावा लागला होता. मागील आठवड्यात अशा काही उद्योगांना परवानग्या देण्यात आलेल्या आहेत की त्यांच्या माध्यमातून राज्यात ६,००० रोजगार निर्माण होणार आहे.

समितीने विचारणा केली की, उद्योगांना परवानगी देत असतांना जमिनीची अडचण येते काय? त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, उद्योग उभे करीत असतांना व त्याकरिता परवानगी देतांना भूसंपादनाची सर्वात मोठी अडचण उद्योजकांना सोडवावी लागते. आपल्या राज्यात बीएमसी आणि शासन यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त जमीन संपादित करण्यात येऊन त्या माध्यमातून नवीन १०,००० नवीन उद्योग उभे राहणार आहेत. त्यातून लाखो रोजगार निर्माण होणार आहे. याबाबतची प्रक्रिया चालू आहे.

विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देऊन तसेच, जास्तीत जास्त नवीन उद्योग उभे राहण्याकरिता परवानग्यांची क्लिष्ट प्रक्रिया सोपी करण्याकिरता एक नोट कॅबिनेटकरिता मुव्ह होण्याच्या स्थितीमध्ये आहे, त्यावरही लवकरच निर्णय होऊन आपल्या सर्वांच्या समोर येईलच. या सर्व बाबींकरिता शासन व प्रशासन प्रयत्न करीत आहेच.

समितीने अशी विचारणा केली की, राजस्थान व गुजरात या राज्यांप्रमाणे उद्योगांच्या परवानगीकरिता जी एक खिडकी योजना चालू केलेली आहे. त्याप्रमाणे आपल्या राज्यातही उद्योगांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. उपनगराच्या जवळपास असणाया ग्रामपंचायती या संदर्भात इच्छुक असतात, मूलभूत सुविधा देऊ शकतात. आपण त्या ग्रामपंचायतींना उत्पन्नाच्या आधारावर देऊ शकत नाही. मात्र त्या, जमीन, पाणी, वीज देऊ शकतात. आपणाकडून त्यांच्यासाठी काही प्रयत्न केले जातात का? त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ग्रामपंचायती जमीन देण्यास तयार असतील तर विचार होऊ शकतो. जमीन असली पाहिजे. ५०-१०० एकर जमीन मिळत असेल तर एमआयडीसी करण्यात येईल. फक्त तेथे पाणी वगैरेंची उपलब्धता असली पाहिजे.

राज्यात जवळपास २३१ औद्योगिक क्षेत्रे आहेत. सर्व शहरांलगतच आहेत असे नाही, काही आहेत. आता ग्रामीण भागात, तालुक्यांत एमआयडीसी करावी असे सांगितले जात आहे आणि तसे झालेही आहे. आणखी काही ठिकाणे सुचविली तर तेथेही एमआयडीसी करण्यास तयार आहोत. उद्योग येत असतील, उद्योगांसाठी जमीन, पाणी, वीज असेल तर एमआयडीसी करता येईल. बाहेरचे मोठे उद्योग आलेच पाहिजेत. आपल्यातील भूमिपूत्र एसएसआयमध्ये आहेत. छोटे रजिस्टर्ड उद्योग एमएसएसआयडीसीमध्ये होते, त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द करून त्यांना शासनाकडून खरेदीमध्ये जे आरक्षण, दिले जायचे, ते रद्द केले आहे, असा निर्णय झाल्याचे ऐकण्यात आले आहे. मग आता एमएसआयनी कुठे जायचे ? नवीन प्रोक्युअरमेंट पॉलिसीबद्दल बोलत आहात. एसएसएसआयडीसीबद्दल निर्णय झालेला नाही. निर्णय असा झाला आहे की, २४१ वस्तू एसएसआयसाठी रिझर्व्ह आहेत. त्या फक्त एसएसआयकडूनच घेतल्या जातील. मग एमएसएसआयडीसी असो किंवा नसो. शासकीय विभागाच्या कोणत्याही खरेदीमध्ये २० टक्के एमएसईबीसाठी राखून ठेवण्यात आले आहे. ते पूर्वी नव्हते. एसएसआयसाठी २४१ वस्तू तशाच राहतील. २० टक्के खरेदी जी एसएसआयसाठी राखीव नव्हती, मात्र तेथे सुद्धा २० टक्के खरेदी एसएसआयकडून केली जाईल आणि त्या २० टक्क्यांमधील ४ टक्के खरेदी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या एसएसआयकडून केली जाईल. एमएसएसआयडीसीमध्ये काही गैरप्रकार होतात या संदर्भात मंत्रिमंडळात निर्णय झाला. एमएसएसआयडीसीने इतरांच्या बरोबर भाग घेतला तर त्यांना ३० टक्क्यांचे आरक्षण आहे. एल-१ च्या रेटवर एमएसएसआयडीसी असो किंवा कोणताही शासकीय उपक्रम असो. त्यांना त्या रेटवर ऑर्डर दिली जाईल. पूर्वी एक रेट ठरविला जात होता. आता नवीन रेट निघतो. त्यामध्ये ३० टक्के आरक्षण मिळू शकेल.

समितीने विचारणा केली की, ७२ हजार कोटी रुपयांचे उद्योग निघतील अशी आपली अपेक्षा आहे. आपल्या राज्यात विजेचे दर जवळच्या राज्यांपेक्षा प्रति युनिटच्या मागे २-२ रुपये जास्त असल्यामुळे उद्योगांवर बाहेर जाण्याची वेळ आली आहे. सूत गिरण्यांसारखे उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. उद्योग विभाग या संदर्भात काही विचार करीत आहे का ? विजेचे दर कमी करण्याची घोषणा केली पण ते वाढविले आहेत. ५० पैशाने प्रति युनिटचे दर वाढविले आहेत. सूत गिरण्यांच्या बाबतीत अनुभव आहेत. मग अशा स्थितीत काय धोरण आहे ?

आपल्या राज्यातील विजेचे दर निश्चितच जास्त आहेत. छत्तीसगड राज्याशी तुलना केली तर ते प्रति युनिट दोन ते अडीच रुपयांनी जास्त आहेत. छत्तीसगडमध्ये कोळसा जास्त आहे आणि तेथेच विजेचे प्रकल्प आहेत, त्यामुळे त्यांचे परिवहन कमी होते, परिणामी तेथील दर कमी आहेत. गुजरातपेक्षाही आपल्याकडे प्रति युनिट १ रुपयाने जास्त वीज दर आहेत. मात्र यावेळी उद्योगांना देण्यात येणा-या विजेचे दर काही प्रमाणात डिसेंबरपेक्षा कमी केले आहेत. विजेच्या दराच्या विषयाबाबत प्रधान सचिव, ऊर्जा विभाग हेच सांगू शकतील. विजेचे दर कमी झाले पाहिजेत असेच आम्हाला वाटते आणि आम्ही सुद्धा त्या संदर्भात प्रयत्न करीत आहोत. काही कंपन्यांनी आपल्याकडे एक्स्टेंशनसाठी प्रयत्न केले किंवा नवीन अर्ज आले. परंतु त्यांना तुमच्याकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे ते परत जात आहेत अशी काही उदाहरणे आहेत का ?

चंद्रपूरमध्ये नवीन उद्योगांवर प्रदूषणाच्या दृष्टीने मोरॅटोरिअम झाले. काही प्रकल्प झाले, त्यांचे मायनिंग गडचिरोलीमध्ये होते. परंतु तेथे काही कारणांमुळे मायनिंग होऊ शकले नाही. उद्योग लावला पण तो डबघाईस आला असे प्रकार झाले आहेत. बाकी काही झालेले नाही.

अभिप्राय व शिफारशी :

''ठाणे जिल्ह्यातील तारापूर एम.आय.डी.सी. मधील अनेक कारखान्यांचा वीज पुरवठा खंडित केल्यामुळे हजारो कामगार बेरोजगार होणे'' या विषयावरील श्री. एकनाथराव खडसे-पाटील, वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी **''ज्या कंपन्या नियमाप्रमाणे अटी व शर्ती पाळत नसतील तर त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल''** असे आश्वासन सभागृहात दिले होते. त्या अनुषंगाने विभागाने सदर **आश्वासन क्र. १७२** च्या आश्वासन पूर्तीबाबत- विभागाने जेएसडब्ल्यू वाशिम व लिबर्टी ऑईनमेंट, बामणे या कंपन्यांच्या संदर्भात सदर कंपन्या जर पर्यावरण विषयक नियमांचे पालन करत नसल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पूर्तीबाबत समितीला लेखी स्वरुपात कळविले.

आश्वासन क्र. १७३ च्या पूर्तीबाबत- प्रदूषण महामंडळ आणि संबंधित इतर महामंडळांच्या प्रमुखांशी बोलून या संदर्भात योग्य ती कारवाई करण्याचा प्रयत्न करीन, यावर विभागाने एसएमएस शिवाजीनगर या कंपनीच्या संदर्भात पाहणी करून त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबत पर्यावरण विभाग तसेच मुंबई महानगरपालिकेस दिनांक ९ जून २०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. असे आश्वासन पूर्तीबाबत लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत कळविले आहे.

आश्वासन क्र. १७४ च्या पूर्तीबाबत- परंतु तरीही हे रस्ते एम.आय.डी.सी. क्षेत्रात असल्यामुळे या रस्त्यांची वर्कऑर्डर दिलेली आहे, या रस्त्यांच्या कामाला लवकरच सुरुवात होईल. यावर विभागाने सांगली, मिरज औद्योगिक क्षेत्रातील मिरज ब्लॉकमधील रस्ते व पथदिवे यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी नवीन दरसूचीनुसार रु.७,८२,७८,००० इतक्या रकमेस सर्वसाधारण मंजुरी देण्यात आली आहे व स्थापत्य कामासाठी रु.६१२.९१ लक्ष रकमेच्या निविदा मागविण्यात आल्या असून पुढील मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत असे लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत नमूद आहे.

आश्वासन क्र.१७७ च्या पूर्तीबाबत- उद्योग बाहेर जाऊ नयेत म्हणून त्या नवीन गोष्टी सांगितल्या आहेत याची १०० टक्के अंमलबजावणी केली जाईल, अशा प्रकारे मा.मंत्रीमहोदयांनी सभागृहात आश्वासने दिली होती. तसेच विभागाने विभागीय साक्षीच्या वेळी प्रदूषणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होते की, नाही यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची देखरेख असते. जर कंपन्या नियमानुसार सांडपाणी प्रक्रिया करीत नसतील व प्रदूषणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करीत नसतील तर त्यांचेवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्यात येते अशी लेखी स्वरुपात माहिती पाठविली.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस असे विदित केले की, एमआयडीसी क्षेत्र हे राज्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने व राज्यातून उद्योग बाहेर जाऊ नयेत यासाठी नवीन औद्योगिक धोरणात सूक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी तसेच विद्यमान घटकांच्या विस्तारासाठी पात्रता कालावधीकरिता औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, मुद्रांक शुल्क माफी (अ व ब वर्गीकृत क्षेत्र वगळून) व विद्युत शुल्क माफी (फक्त नवीन घटकांसाठी) अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच नवीन सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना विद्युत देयकात ५० पैसे ते १ रुपया प्रती युनिट इतकी सवलत उत्पादनांच्या दिनांकापासून तीन वर्षांपर्यंत (अ वर्गीकृत क्षेत्र वगळून) व मुदत कर्जावर ५ टक्के व्याज अनुज्ञेय करण्यात आले आहे. तसेच मोठ्या उद्योगांना क्षेत्रनिहाय वर्गीकरणानुसार ७ वर्षांसाठी अनुज्ञेय भांडवली गुंतवणुकीच्या ३० ते ८० टक्क्यांपर्यंत औद्योगिक विकास प्रोत्साहने देण्याचा तर सुक्ष्म व लघु उद्योगांना क्षेत्रनिहाय वर्गीकरण विचारात घेऊन ७ ते १० वर्षांसाठी १० ते १०० टक्क्यांपर्यंत प्रोत्साहने देण्याचा समावेश आहे. सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, तारापूर एमआयडीसी क्षेत्र एक मोठे औद्योगिक क्षेत्र असून सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा प्रॉब्लेम झाल्यामुळे हे प्रकरण उद्भवले होते. या क्षेत्रातील ५८ छोट्या उद्योगांमधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत होती. या उद्योगांच्या सांडपाण्यावर प्रक्रिया न होता त्या पाण्यामुळे प्रदूषण वाढल्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशानुसार या कंपन्यांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता. ज्या छोट्या उद्योगांना सांडपाण्यावर प्रक्रिया करणे परवडत नाही त्यांचेकरिता १ कॉमन इन्फ्ल्यूएंट

वॉटर ट्रीटमेंट प्लॅनचे काम सुरू आहे. एमआयडीसी लगतच्या रहिवासी परिसरामध्ये या पाण्याचे प्रदूषण टाळण्याकरिता काही पाणी प्रक्रियेनंतर इतरत्र न सोडता समुद्राजवळ सोडण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

उद्योगांना परवानगी देत असताना जमिनीच्या अडचणीसंदर्भात समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी असे विदित केले की, नवीन उद्योग उभे करीत असताना व त्यासंदर्भात परवानगी देत असताना भूसंपादनाची मोठी अडचण उद्योजकांना सोडवावी लागते. राज्यात शासनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त जमीन संपादित करून त्या माध्यमातून नवीन १०,००० उद्योग उभे राहणार आहेत. त्यातून लाखो रोजगार निर्माण होणार असून याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त नवीन उद्योग उभे राहण्याकरिता मंजुरीची क्लिष्ट प्रक्रिया सोपी करण्याकरिता मंत्रिमंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांनी पुढे असेही सांगितले की, उद्योगांसाठी जमीन, वीज, पाणी असेल तर त्या ठिकाणी एमआयडीसी करता येईल. बाहेरचे मोठे उद्योग राज्यात आलेच पाहिजेत. तसेच राज्यातील भूमीपुत्रांना त्यात रोजगार मिळाला पाहिजे. तसेच समितीने आपल्या राज्यात इतर राज्याच्या तुलनेत विजेचे दर जास्त आहेत यावर भाष्य करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, छत्तीसगड राज्याच्या तुलनेत आपल्या राज्यात विजेचे प्रती युनिट दर २ ते अडीच रुपयांनी जास्त आहेत. छत्तीसगडमध्ये कोळसा जास्त असल्यामुळे तेथे विजेचे प्रकल्प जास्त आहेत. त्यामुळे त्यांचे परिवहन कमी होते. गुजरातपेक्षाही आपल्याकडे एक रुपया जास्त दराने विजेचे दर आहेत. डिसेंबरमध्ये उद्योगांना देण्यात येणा-या विजेच्या दरामध्ये कपात केली आहे. विजेचे दर कमी करण्याच्या संदर्भात ऊर्जा विभाग प्रयत्नशील आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता आश्वासनांच्या पूर्ततेबाबत बहुतांश कारवाई विभागाद्वारे पूर्ण करण्यात आल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते. तथापि, उद्योगांना परवानगी देताना अनेक जाचक अटींचा सामना नवीन उद्योजकांना करावा लागत आहे. त्यामुळे राज्यात अनेक उद्योग-धंदे सुरू करण्यास उद्योजक तयार होत नाहीत. विजेचे दर देखील शेजारच्या राज्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्याचा देखील जास्तीचा भार नवीन उद्योजकांना सोसावा लागतो. शासनाच्या धोरणाप्रमाणे १०,००० नवीन उद्योगांना परवानगी देऊन उद्योग उभे राहणार आहेत व त्यातून लाखो रोजगार निर्माण होऊन बेरोजगारी कमी होणार आहे असे आशादायी चित्र विभागीय सचिवांनी समितीसमोर उभे केले. असे असले तरी सदरच्या बाबी केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात शासनाने कृती करावी व उद्योगांना मंजुरी देण्याबरोबरच रोजगार निर्मितीसाठी सचिवांनी समितीस सांगितल्याप्रमाणे नवीन उद्योगांना परवानगी देण्याबाबतची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने एक खिडकी योजनेसारखी योजना आखून योग्य ती उपाययोजना करून उद्योजकांना नवीन उद्योगासाठी मंजुरी, अर्थसाह्य तसेच शेजारच्या राज्याच्या विजेच्या दराच्या तुलनेत राज्यातील विजेचे दर देखील स्थिर ठेवण्यात यावेत व त्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

नगरविकास विभाग

विधानसभा आश्वासन क्रमांक :- ३२२, ३२३, ३२४ व ३२५, विधानसभा कामकाज खंड १६७, क्रमांक १०, दिनांक २० डिसेंबर २०१३.

''ठाणे जिल्ह्यामध्ये मेट्रो आणि मोनो रेल प्रकल्प राबविण्याबाबत'' या विषयावरील सर्वश्री. प्रताप सरनाईक व इतर वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा.नगरविकास राज्यमंत्री यांनी **(१) आश्वासन क्रमांक ३२२-** डी.पी.आर करून केंद्राकडे हा प्रस्ताव पाठविला जाईल. केंद्राने परवानगी दिल्यानंतर ठाणे जिल्ह्यासंदर्भात सकारात्मक दृष्टीने प्रकल्प पूर्ण करण्यात येईल. **(२) आश्वासन क्रमांक ३२३-** महाराष्ट्र शासन लवकरच पुढाकार घेऊन अभ्यास गटाची स्थापना करेल. **(३) आश्वासन क्रमांक ३२४ -** हा लिंक जोडल्यामुळे दोन मोठी शहरे एकत्र येणार आहेत. असा उल्लेख केला ही बाब तपासून घेण्यात येईल, ते देखील सल्लागाराच्या आणि शासनाच्या दृष्टीने योग्य असेल तर तेही हाती घेण्यात येईल. **(४) आश्वासन क्रमांक ३२५-** कन्सलटटना कमी कालावधीत सल्ला देण्याचे निर्देश दिले जातील. त्यांनी दिलेला सल्ला योग्य असेल तर पिंपरी, चिंचवड, पुणे आणि नवी मुंबईच्या धर्तीवर ठाण्यामध्ये सुविधा देण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करेल, असे आश्वासन दिले होते.

विभागाने केलेली कार्यवाहीबाबत सादर केलेल्या माहितीत नमूद केले आहे की, (१) **आश्वासन क्रमांक ३२२-** ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, **'' वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)-कासारवडवली मेट्रो मार्ग ''** अंशतः उन्नत/भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, त्यासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच ठाणे-भिवंडी-कल्याण मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अहवाल हा वर्ष २००५ मध्ये केलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या सर्वेक्षणावर आधारित असल्याने ठाणे-भिवंडी व कल्याण या परिसरातील दैनंदिन, वाहतूक प्रवासी संख्या आणि भविष्यात होणारा विकास लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एखाद्या सुयोग्य सल्लागाराची नियुक्ती करून सदर भागासाठी रेल आधारित सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेचा सुसाध्यता अभ्यास करून सुधारीत अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ मे, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) **आश्वासन क्रमांक ३२३---** मुंबई महानगर क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेला सर्वंकष वाहतूक व्यवस्थेचा आराखडा आवश्यक त्या नवीन क्षेत्रीय सर्वेक्षणासह अद्ययावत करून घेण्यासंदर्भात शासनाकडून दिनांक ९ जुलै,२०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

(३) **आश्वासन क्रमांक ३२४---** ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, **''वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)-कासारवडवली मेट्रो मार्ग ''** अंशतः उन्नत/भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, त्यासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच ठाणे-भिवंडी-कल्याण मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अहवाल हा वर्ष २००५ मध्ये केलेला सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या सर्वेक्षणावर आधारित असल्याने ठाणे-भिवंडी व कल्याण या परिसरातील दैनंदिन वाहतूक प्रवासी संख्या आणि भविष्यात होणारा विकास लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एखाद्या सुयोग्य सल्लागाराची नियुक्ती करून सदर भागासाठी रेल आधारित सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेचा सुसाध्यता अभ्यास करून सुधारीत अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ मे २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मुंबई महानगर क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वंकष वाहतूक व्यवस्थेचा आराखडा (CTS) आवश्यक त्या नवीन क्षेत्रीय सर्वेक्षणासह अद्ययावत करून घेण्यासंदर्भात शासनाकडून दिनांक ९ जुलै २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण्यास कळविण्यात आले आहे.

(४) **आश्वासन क्रमांक ३२५---** वडाळा-घाटकोपर-तीन हात नाका-कासारवडवली मेट्रो मार्गाची अंमलबजावणी करण्याकरिता पूर्वद्रुतगती मार्ग व लालबहादूर शास्त्री मार्गावरील होणारा विकास लक्षात घेता सदर मेट्रो मार्ग अंशतः उन्नत/भुयारी करण्याच्या पर्यायाची चाचपणी करून सल्लागारामार्फत सुधारीत सविस्तर प्रकल्प तयार करण्याकरिता मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन मार्फत मे. राईटस् यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागाराने अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर २०१४ मध्ये सादर केला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

विभागाने केलेल्या कार्यवाहीने समितीचे समाधान न झाल्यामुळे शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले. त्यावर संबंधीत विभागाने साक्षीच्या वेळी आश्वासनाच्या सद्यःस्थितीच्या विवरणपत्रामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले आहे की,

(१) आ.क्र. ३२२- ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, 'वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)-कासारवडवली मेट्रो मार्ग अंशतः उन्नत/भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये सादर केला आहे. सदर ३२ कि.मी. लांबीचा अंशतः भुयारी मेट्रो रेल्वे मार्गाच्या या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. १९,०९७.२ कोटी प्रस्तावित असून सदर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्त संस्थांच्या अर्थसहाय्याने राज्य व केंद्रशासनाच्या समभागाने करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

ठाणे-भिवंडी व कल्याण या परिसरातील दैनंदिन वाहतूक प्रवासी संख्या आणि भविष्यात होणारा विकास लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एखाद्या सुयोग्य सल्लागाराची नियुक्ती करून सदर भागासाठी रेल आधारित सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेचा सुसाध्यता अभ्यास करून सुधारीत अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ मे, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या मार्गावर योग्य ती सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेची (MRTS) पुन्हा तपासणी करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता सल्लागाराची निवड करण्यात आली असून पुढील काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(२) आ. क्र. ३२३- मुंबई महानगर क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वंकष वाहतूक व्यवस्थेचा आराखडा (CTS) आवश्यक त्या नवीन क्षेत्रीय सर्वेक्षणासह अद्ययावत करून घेण्यासंदर्भात शासनाकडून दिनांक ०९ जुलै, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) आ. क्र. ३२४- ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, ''वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)- कासारवडवली मेट्रो मार्ग '' अंशतः उन्नत/भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये सादर केला आहे. सदर ३२ कि.मी. लांबीचा अंशतः भुयारी मेट्रो रेल्वे मार्गाच्या या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. १९, ०९७.२ कोटी प्रस्तावित असून सदर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्त संस्थांच्या अर्थसहाय्याने राज्य व केंद्रशासनाच्या समभागाने करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

ठाणे-भिवंडी व कल्याण या परिसरातील दैनंदिन वाहतूक प्रवासी संख्या आणि भविष्यात होणारा विकास लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एखाद्या सुयोग्य सल्लागाराची नियुक्ती करून सदर भागासाठी रेल आधारित सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेचा सुसाध्यता अभ्यास करून सुधारीत अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ मे, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या मार्गावर योग्य ती सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेची (MRTS) पुन्हा तपासणी करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची निवड करण्यात आली असून पुढील काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

मुंबई महानगर क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वंकष वाहतूक व्यवस्थेचा आराखडा (CTS) आवश्यक त्या नवीन क्षेत्रीय सर्वेक्षणासह अद्ययावत करून घेण्यासंदर्भात शासनाकडून दिनांक ०९ जुलै, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) आ.क्र. ३२५- ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, ‘‘ वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)- कासारवडवली मेट्रो मार्ग ’’ अंशतः उन्नत/भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये सादर केला आहे. सदर ३२ कि.मी. लांबीचा अंशतः भुयारी मेट्रो रेल्वे मार्गाच्या या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. १९, ०९७.२ कोटी प्रस्तावित असून सदर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्त संस्थांच्या अर्थसहाय्याने राज्य व केंद्रशासनाच्या समभागाने करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

समितीने अशी विचारणा केली की, ठाणे जिल्ह्यामध्ये मेट्रो आणि मोनो रेल प्रकल्प राबविण्याबाबत, या विषयाच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना तत्कालीन राज्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते त्याची पूर्तता झाली आहे काय. त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या आश्वासनांच्या अनुषंगाने मेट्रो व मोनो रेल असे दोन विषय आहेत. मेट्रो रेल्वेच्या बाबतीत सांगू इच्छितो की, ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, ‘वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)-कासारवडवली मेट्रो मार्ग असा मेट्रो मार्ग करण्याबाबतचा हा विषय आहे. या मार्गाला एमएमआरडीएने परवानगी दिली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सदरहू विषय प्रस्तावित करण्यात आला आहे.

तसेच दुस-या विषयाच्या बाबतीत सांगतो की, ठाणे शहरात मोनोरल किंवा तत्सम वेगळी व्यवस्था करण्याची गरज आहे काय, हा एक विषय आहे. मुंबईमध्ये मोनो रेल प्रकल्प करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या रिझल्ट बाबत अभ्यास करून व प्राधिकरणामार्फत वेगळा कन्सल्टंट नेमून या विषयी अभ्यास करण्यात येत आहे. ज्या मेट्रो लाईनचे जाळे मुंबई आणि आजूबाजुच्या परिसरात निर्माण होणार आहे त्या व्यतिरिक्त, इतर ठिकाणी वाहतुकीची व्यवस्था करावी लागणार आहे काय या बाबतचा अभ्यास स्वतंत्र सल्लागारामार्फत करण्यात येत आहे. हा अभ्यास झाल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. मी सुरुवातीला सांगितल्यानुसार ठाण्याच्या मेट्रो रेल्वे मार्गाचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर येणे प्रस्तावित आहे. कदाचित यानंतर होणा-या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या प्रकल्पाला मान्यता मिळू शकेल.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, मेट्रो आणि मोनो रेल्वेच्या प्रकल्पावर शासनाचा पैसा खर्च करून प्रवाशांसाठी वाहतुकीची व्यवस्था केली जाणार आहे. मेट्रो आणि मोनो प्रकल्पाची टोटल प्रोजेक्ट कॉस्ट आणि प्रवाशांची सोय तसेच या प्रकल्पातून मिळणारे उत्पन्न पाहता हा प्रोजेक्ट व्हायबल होऊ शकतो काय.

याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, मोनो रेल मुंबईतील पूर्ण रुटवर धावणार आहे. परंतु सध्या ती निम्म्याच रुटवर सुरू आहे. कारण मोनो रेलचा निम्मा टप्पा अजून पूर्ण झालेला नाही. त्यामुळे मोनो रेलमधून जे उत्पन्न अपेक्षित धरले होते ते आजच्या घडीला मिळत नाही. मेट्रो रेल्वेच्या तिकीट दरातून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व्हायबल होईल अशी परिस्थिती कोठेही नाही. मेट्रो रेल्वेमधून एका तासाला ७०-८० हजार प्रवासी वाहतूक एका दिशेने झाली तरच ही वाहतूक व्यवस्था शासनाच्या दृष्टीने व्हायबल होऊ शकते. आजच्या घडीला सुरू असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पातून प्रवास करणा-यांची संख्या बरीच मोठी आहे. मुंबईमध्ये मेट्रो रेल्वेचे संपूर्ण जाळे निर्माण झाल्यानंतर त्यातून जे प्रवासी प्रवास करतील त्यांची संख्या पाहता तिकिटाच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नातून मेट्रोचा दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचा खर्च निघू शकेल. परंतु केवळ विक्रीच्या उत्पन्नातून कोणत्याही मेट्रो प्रकल्पाचा संपूर्ण खर्च भागू शकत नाही. त्यामुळेच उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्यासाठी विविध

जाहिराती किंवा अन्य गोष्टी केल्या जातात. या सर्व बाबींचा अंतर्भाव प्रकल्प अहवालात केलेला आहे. हा खर्च डेव्हलपमेंट चार्जेस आणि ट्रान्झिट ओरिऐंटेड डेव्हलपमेंट चार्जेस मधून होऊ शकतो.

समितीने अशी विचारणा केली की, मेट्रो ही सार्वजनिक सोईची व्यवस्था आहे. मेट्रोचा विचार अनेक वर्षांपासून सुरू आहे. परंतु यामध्ये कोणत्या अडचणी आहेत आणि अंतिम निर्णय केव्हा होणार आहे? या प्रकल्पाची किंमत किती आहे?

विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मुंबई शहरात मेट्रोची एक लाईन कार्यरत आहे. मुंबई-ठाणे मेट्रो रेल्वेच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्याला केंद्र शासनाची मान्यता घ्यावी लागेल. केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्यासाठी जो लोनचा कम्पोनन्ट आहे तो कदाचित जपानच्या बँकेकडून किंवा आणखी कोणत्या वित्तीय संस्थेकडून घ्यावा लागणार आहे आणि त्यामध्ये साधारणतः ५० टक्के कर्ज आहे. जे ५० टक्के कर्ज उभारावयाचे आहे त्या संबंधीची संपूर्ण रचना करावी लागेल. ही सर्व प्राथमिक कार्यवाही पूर्ण होण्यासाठी साधारणतः ८ ते १२ महिन्यांचा कालावधी लागू शकतो. राज्य मंत्रिमंडळाची मान्यता, केंद्र शासनाची मान्यता, यासंबंधी कमिटी गठित करणे आणि पाणीपुरवठा करण्यासंबंधीचे टायअप हे सर्व झाल्यानंतर निविदा काढण्यात येईल. हे काम पूर्ण होण्यासाठी साधारणतः ३ ते ४ वर्षांचा कालावधी लागू शकतो.

ज्यावेळी या प्रोजेक्टचे प्लॅनिंग करण्यात आले त्यावेळी या प्रकल्पाचा खर्च साधारणपणे २५ हजार कोटी रुपये होता. हा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत तो २७ हजार कोटी रुपये होईल. ३५ किलो मीटरची रेल्वे लाईन आहे आणि भक्तीपार्क, आणिक नगर, प्रियदर्शनी, कुर्ला, विद्याविहार, घाटकोपर, गोदरेज कॉलनी, विक्रोळी इत्यादी ३० स्थानकांचा यामध्ये समावेश आहे. कासारवडवली हे शेवटचे स्टेशन आहे. ही मेट्रो लाईन काही ठिकाणी भूमिगत आहे, तर काही ठिकाणी एलिवेटेड आहे. ही मेट्रो लाईन २७ किलो मीटर भूमिगत आणि ५ किलो मीटर एलिवेटेड आहे, घाटकोपर आणि ओवळा येथे मेट्रोचे डेपो असणार आहेत. साधारणतः प्रोजेक्ट पूर्ण होण्याची जी किंमत आहे ती २५ हजार कोटी रुपये आहे. यामध्ये २० टक्के केंद्र शासनाकडून निधी मिळण्याची शक्यता आहे आणि ३० टक्के राज्य शासन किंवा मुंबई प्राधिकरण आपला हिस्सा यामध्ये टाकू शकेल. यासाठी जो वित्तीय पुरवठा करावयाचा आहे तो साधारणपणे ५० टक्के असू शकेल. २०२१ मध्ये या मार्गाने साधारणपणे प्रती दिन साडेसात ते आठ लाख प्रवासी प्रवास करतील, अशी अपेक्षा आहे. आपण यामध्ये ४, ६ किंवा ८ असे गरजेनुसार कोच वाढविण्याचे प्लॅनिंग केलेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रोजेक्टची कॉस्ट २५ हजार कोटी रुपये आहे काय, ३० किलो मीटर मेट्रोच्या मार्गासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. म्हणजे प्रती किलो मीटर ८०० कोटी रुपये खर्च येईल? केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव केव्हा सादर करण्यात येणार आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी नमूद केले की,

सन २०१९ पर्यंत हा प्रोजेक्ट पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तोपर्यंत २५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सन २०२०-२१ मध्ये जी रायडरशीप अपेक्षित आहे. मेट्रो लाईन ५ किलो मीटर एलिवेटेड आणि २७ किलो मीटर भूमिगत असणार आहे. भूमिगत मेट्रोसाठी जास्त खर्च येतो. राज्य मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर लगेच तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात येईल. कदाचित, या नंतरच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव सादर होईल.

अभिप्राय व शिफारशी :

''ठाणे जिल्ह्यामध्ये मेट्रो आणि मोनो रेल प्रकल्प राबविण्याबाबत सर्वश्री प्रताप सरनाईक व इतर वि.स.स.'' यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा.नगरविकास राज्यमंत्री यांनी **आश्वासन क्र.३२२** संदर्भात ठाणे शहर मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, 'वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका) कासारवडवली मेट्रो मार्ग' अंशतः उन्नत/ भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून त्या संदर्भात मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच ठाणे-भिवंडी-कल्याण मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक आर्थिक सुसाध्य अहवाल हा वर्ष २००५ मध्ये केलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या सर्वेक्षणावर आधारित असल्याने ठाणे-भिवंडी व कल्याण या परिसरातील दैनंदिन वाहतूक प्रवासी संख्या आणि भविष्यात होणारा विकास लक्षात घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एखाद्या सुयोग्य सल्लागाराची नियुक्ती करून सदर भागासाठी रेल आधारित सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेचा सुसाध्य अभ्यास करून सुधारीत अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ मे, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीने समाधान व्यक्त केले असून लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहिती संदर्भात समितीला आ वासीत केल्याप्रमाणे उपरोक्त बाबीचा पाठपुरावा करून नमूद केलेल्या प्रकल्पासंदर्भात सल्लागाराची नियुक्ती करून उपरोक्त नमूद प्रकल्प पूर्ण करण्यासंदर्भात तातडीने पावले उचलून कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

आश्वासन क्रमांक ३२३ व ३२४ :- मुंबई महानगर क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वंकष वाहतूक व्यवस्थेचा आराखडा (CTS) आवश्यक त्या नवीन क्षेत्रीय सर्वेक्षणासह अद्ययावत करून घेण्यासंदर्भात शासनाकडून दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविण्यात आले असून त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही प्रगती पथावर असल्याचे समितीला कळविलेल्या माहितीवरुन दिसून येते. **या संदर्भात समितीला कळविल्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा करून संदर्भाधीन कार्यवाही विहित मुदतीत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

आश्वासन क्रमांक ३२५ :- ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, 'वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका)-कासारवडवली' मेट्रो मार्गाची अंमलबजावणी करण्याकरिता पूर्वद्रुतगती मार्ग व लालबहादूर शास्त्री मार्गावरील होणारा विकास लक्षात घेता सदर मेट्रो मार्ग अंशतः उन्नत/ भुयारी करण्याच्या पर्यायाची चाचपणी करून सल्लागारामार्फत सुधारित सविस्तर प्रकल्प तयार करण्याकरिता मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशन मार्फत मे. राईटस् यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागाराने अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये सादर केला. मुंबई, मेट्रो रेल कार्पोरेशनच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे अशी माहिती आश्वासन पूर्ततेबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात विभागाने समितीला पाठविलेली आहे.

या संदर्भात विभागाने विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी या प्रकरणातील सद्यःस्थितीच्या माहिती संदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे माहिती पाठविली.

ठाणे शहराला मुंबईशी जोडण्याची निकड लक्षात घेता, वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका) - कासारवडवली मेट्रो मार्ग अंशतः उन्नत भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर मेट्रो प्रकल्पाच्या सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये सादर केला आहे. सदर ३२ कि.मी. लांबीचा अंशतः भुयारी मेट्रो रेल्वे मार्गाच्या या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.१९,०७२.२ कोटी प्रस्तावित असून सदर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी द्विपक्षीय/ बहुपक्षीय वित्त संस्थांच्या अर्थसाह्याने राज्य व केंद्र शासनाच्या समभागाने करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीस असे विदित केले की, मा.मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मेट्रो व मोनो असे दोन विषय आहेत. उपरोक्त नमूद केलेल्या मेट्रो मार्गाबाबत मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असून, मुंबईमध्ये मोनो रेल प्रकल्प करण्यात आला असून या प्रकल्पाच्या रिझल्टबाबत अभ्यास करून व प्राधिकरणामार्फत वेगळा सल्लागार नेमून अभ्यास करण्यात येत आहे. सल्लागाराने अहवाल दिल्यानंतर त्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. मोनो रेल मुंबईतील पूर्ण रुटवर धावणार आहे, परंतु सध्या ती निम्म्याच रुटवर सुरू आहे. कारण मोनो रेलचा पूर्ण टप्पा अजून पूर्ण झाला नाही. त्यामुळे मोनो रेलचे जे अपेक्षित उत्पन्न धरले होते ते आजच्या घडीला मिळत नाही. मेट्रो रेल्वेच्या तिकिट दरातून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व्हायबल होईल अशी परिस्थिती कोठेही नाही. मेट्रो रेल्वेमधून प्रवास करणा-या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून या प्रवाशांच्या तिकिटांच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नातून मेट्रोचा दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचा खर्च निघू शकेल. परंतु केवळ तिकिट विक्रीच्या उत्पन्नातून कोणत्याही मेट्रो प्रकल्पाचा खर्च भागू शकत नाही. त्यामुळेच उत्पन्नाचे विविध स्त्रोत निर्माण करण्यासाठी जाहिराती किंवा अन्य बाबी केल्या जातात. या सर्व बाबींचा अंतर्भाव प्रकल्प अहवालात केला असून हा खर्च डेव्हलपमेंट चार्जेस आणि ट्रँझिस्ट ओरिएंटेड डेव्हलपमेंट चार्जेसमधून होऊ शकतो.

मा. मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनासंदर्भात विभागाने केलेली कार्यवाही तसेच विभागीय साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीला दिलेली माहिती विचारात घेता वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका) - कासारवडवली मेट्रो मार्ग अंशतः उन्नत भुयारी करण्याच्या पर्यायाबाबत परिक्षण करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करून या मार्गासाठी रु.१९,०९७.२ कोटी प्रस्तावित असून मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेला प्रस्ताव तसेच मुंबईतील मोनो रेलचे प्रलंबित असलेले काम इत्यादी पूर्ण करण्यासाठी विभागाने सातत्याने पाठपुरावा करून मुंबई व परिसरातील वाहतूक समस्या दूर करण्यासाठी सदरचे जलद प्रकल्प जलद गतीने पूर्ण होऊन ते प्रवाशांसाठी तातडीने उपलब्ध करण्यासंदर्भात कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.